कापूस, सोयाबीन, भात, तुर व हरभरा पिकांवरील किड रोगांच्या व्यवस्थापनासाठी किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) राज्यात सन २०१७-१८ मध्ये राबविण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : किरोनि-१४१८/प्र.क्र.२१/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२
तारीख :- १५ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :-

१) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं.२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७
२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं.२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७
३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.किरोनि-१४१७/प्र.क्र.१५८/४अे, दि.०६.०७.२०१७.
४) वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं.२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.६ फेब्रुवारी, २०१८.
५) संचालक विस्तार व प्रशिक्षण यांचे पत्र जा.क्र./वि.प्र-७/क्रॉपसॅप १७-१८/अनु.वा/८६/१८, दि. २ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात गेल्या काही वर्षातील पावसाची अनियमितता, त्यामध्ये पडणारा खंड आणि त्यानुसार हवेत होणारे चढउतार, यामुळे पिकांवरील कीड आणि रोगांच्या वाढीकरीता अचानक निर्माण झालेल्या विशिष्ठ अनुकुल परिस्थितीमुळे मोठया प्रमाणात कीड रोगांचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. मागील काही वर्षात प्रामुख्याने सोयाबीन पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, विदर्भ आणि मराठवाडा विभागामध्ये प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत होते. कापूस व सोयाबीन ही नगदी पिके, भात हे तृणधान्य वर्गीय पिक तसेच तूर व हरभरा ही कडधान्य वर्गीय पिके शेतकऱ्यांसाठी आर्थिक दृष्टीने महत्वाची आहेत. सदर पिकांवर उद्भवणाऱ्या किडारोगांच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. हे नुकसान टाळता यावे, यासाठी कृषी विभागामार्फत "कापूस,सोयाबीन,भात,तुर व हरभरा पिकावरील कीडरोगाच्या व्यवस्थापनासाठी सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) आखण्यात आला असून, त्याद्वारे शेतकऱ्यांना कीड रोगाविषयी सर्वेक्षणाच्या आधारे करावयाच्या पिक संरक्षण उपाययोजना याबाबतचे संदेश देणे, शेतकऱ्यांमध्ये कीडरोगांची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करुन कीडरोगाचे वेळीच व्यवस्थापन करणे, कीडरोगांच्या प्रादुर्भावाबाबत जागरुकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे, इ. उपाययोजना करण्यात येतात.

सदर योजना सन २००९-१० पासून राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून राबविण्यात येत होती. ही योजना सन २०१३-१४ पासून राज्य योजना म्हणून राबविण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे. सदर प्रकल्प सन २०१७-१८ या वर्षात राबविण्यासाठी ₹ ११४५.३२ लक्ष निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन, सदर प्रकल्पासाठी मंजूर तरतूद ₹ ११०० लक्ष रकमेच्या ७०% म्हणजेच ₹ ७७० लक्ष इतका निधी वरील अनुक्रमांक ३ येथील दिनांक ६ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आली आहे. आता वित्त विभागाच्या वरील वाचा येथील अनु.क्र.४ येथील परिपत्रकान्वये वितरीत रकमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

१) राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये कापूस,सोयाबीन,भात व तुर पिकांवरील व २९ जिल्हयांमध्ये हरभरा या पिकावरील कीड रोगांच्या व्यवस्थापनासाठी, राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषी संशोधन परिषद), नवी दिल्ली, केंद्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नागपुर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ (MPKV), राहुरी, जिल्हा-अहमदनगर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ (PDKV) अकोला, डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषी विद्यापीठ (BSKKV) दापोली, जिल्हा-रत्नागिरी, मराठवाडा कृषि विद्यापीठ (MAU), परभणी, सोयाबीन संशोधन संचालनालय, इंदोर, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, नागपूर, राष्ट्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था (CRIDA), हैद्राबाद, केंद्रीय भात संशोधन संस्था (CRRI), कटक, ओरिसा, भारतीय कडधान्य संशोधन संस्था (IIPR), कानपूर, उत्तरप्रदेश, राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था (NIPHM), हैद्राबाद, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या सहभागाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये "पिकावरील कीडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)" राबविण्यासाठी मंजूर तरतूद ₹ ११००.०० लक्षच्या १० टक्के ₹ ११० लक्ष (अक्षरी: रुपये एक कोटी दहा लक्ष फक्त) रकमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर निधी पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०१७-१८ च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

लेखाशीर्ष :-

मागणी क्र.डी-३,
२४०१,पीक संवर्धन,
१०२ - अन्नधान्य पिके,
(००) (३०) पिकावरील किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
(२४०१९२४२) राज्य योजना
३३ - अर्थसहाय

३) सदर प्रकल्पांतर्गत मंजूर केलेला निधी खर्च करण्यास कृषी आयुक्तालयीन स्तरावर सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन, सदर निधीचे क्षेत्रिय स्तरावर संबंधिताना वितरण करणे, यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत

आहे. त्याचप्रमाणे सदर प्रयोजनार्थ विभागीय कृषी सह संचालक स्तरावर विभागीय कृषी सह संचालक कार्यालयातील लेखाधिकारी, जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभाग स्तरावर उपविभागीय कृषी अधिकारी व तालुकास्तरावर तालुका कृषी अधिकारी यांना आहरण व वितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४) सदरहू प्रकल्प, विभागातील सर्व स्तरातील उपलब्ध कृषी अधिकारी व कृषी सहायक यांच्याकडून राबविण्यात यावा. सदरहू कार्यक्रम आपला आहे, अशी जाणीव कृषी आयुक्तालयातील तसेच विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी ठेवून प्रकल्पाची अंमलबजावणी करावी.

५) बाहेरुन नियुक्त करावयाचे मनुष्यबळ नोंदणीकृत संस्थांकडून उपलब्ध करुन घ्यावे. त्या अनुषंगाने, संस्थेशी प्रचलीत शासन कार्यपद्धती व नियमानूसार विहित अटी व शर्तीसह करार करावा. कराराच्या अटी व शर्ती विहीत करण्यास संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष पीक परिस्थितीनुसार प्रकल्पांतर्गत समाविष्ट पिकांच्या पेरणी क्षेत्रात वाढ/घट झाल्यास, प्रत्यक्ष पेरणी क्षेत्रानुसार किड सर्वेक्षक, संगणक प्रचालक, कृषी पर्यवेक्षकाच्या नियुक्तीस व अनुषंगीक खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर प्रकल्प, योजनेसंबंधीच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात यावा. या योजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्या स्वाक्षरीने शासनास सादर करावे.

७) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक अर्थसं.२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७ अन्वये परिशिष्टातील तपासणी सूचीतील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत असून, त्यास अपर मुख्य सचिव (कृषी) यांनी ही मान्यता दिलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१५१५२५४९१७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant
Chandrakant
Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.02.15 15:32:59 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे (५प्रती)
२. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
३. कुलगुरु, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

४. कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहूरी अहमदनगर
५. कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
६. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य
७. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½, मुंबई/ नागपुर
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे
१०.संचालक, राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषी संशोधन परिषद), नवी दिल्ली
११.संचालक, केंद्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र, नागपूर
१२.संचालक, सोयाबीन संशोधन संचालनालय, इंदोर
१३.संचालक, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, नागपुर
१४.संचालक, राष्ट्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था (CRIDA) , हैद्राबाद
१५.सर्व संचालक/सहसंचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे
१६.विभागीय आयुक्त (सर्व)
१७.विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)
१८. जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून सर्व)
१९.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२०.जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
२१.वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई-३२
२२.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कार्यासन आधिकारी, कृषी विभाग (कृषी)
२३.मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२४.मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
२५.निवड नस्ती (कार्यसन ४अे)